कॉर्पोरेट साम्राज्यवाद

भांडवलशाही आणि साम्राज्यवाद

चंद्रशेखर पुरंदरे

भांडवलशाही आणि भांडवलशाही साम्राज्यवाद यांचे सध्याचे रूप पहाण्याचा लेखाचा प्रमुख उद्देश आहे. त्या अनुषंगाने राष्ट्र-राज्य, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेबाबतचे रूढ गैरसमज यांचाही उल्लेख केला आहे. मुख्यत: पश्चिमेतील या विषयांवरच्या वर्तमान विचारप्रवाहांची ओळख लेखावरून व्हावी.

भांडवलशाही

भांडवलशाही ही पुस्तकी व्याख्या करता येण्यासारखी एक निश्चित संकल्पना आहे अशी भांडवलशाहीच्या बहुतेक समर्थकांची व विरोधकांची भूमिका असते. ती काही निश्चित नियमावली पाळते, सरकारी-खासगी क्षेत्रातील जबाबदारीची एक नेटकी व कायमची विभागणी करता येणे हे गृहीत या 'स्थिर' संकल्पनेमागे असते. एका विचारानुसार भांडवलशाही ही परिवर्तनशील प्रक्रिया आहे. ती ऐतिहासिकदृष्ट्या बदलत आलेली आहे आणि स्थलकालानुसार आजही बदलत आहे.

ऐतिहासिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि भौगोलिक स्थान यानुसार जगात भांडवलशाहीचे दोन किंवा तीन अवतार मानले जातात. पश्चिमेतील पारंपारिक भांडवलशाही पहिली. दुसरी, चीनने उदयाला आणलेली एकतंत्रीय राजवटीखालची शासकीय भांडवलशाही. या दोन्हीबरोबर, भारत, दक्षिण कोरिया, थायलंड, इंडोनेशिया वगैरे पूर्व आशियातील लोकशाही भांडवलशाही ही पाश्चिमात्य लोकशाही भांडवलशाहीच्या प्रारूपापेक्षा निराळी आहे, असा तिसरा अवतारही मानला जातो.

भांडवलशाही साम्राज्यवाद ही संकल्पना मुख्यत: (किंवा फक्त) अमेरिकेच्या संदर्भात वापरली जाते. लेखाच्या दुसऱ्या भागात त्याचा आढावा घेतला आहे.

भांडवलशाहीचे दोन प्रकार आहेत का तीन हा मुद्दा फक्त ती लवचिक संकल्पना आहे हे नोंदवण्यासाठी नमूद केला. खरे पाहता, चीनची सामाजिक वैशिष्ट्ये, अलग संस्कृती, एकवंशीय बहुसंख्य लोकसंख्या, एकपक्षीय राजवट, लोकशाहीचा अभाव या कारणांनी चीनच्या भांडवलशाहीची नक्कल जगात श्रेयस्कर मार्गाने होताना दिसत नाही. हुकूमशाही राजवटी अंतर्गत विरोध दाबण्यासाठी ती नक्कल करतील पण ती उदाहरणे विरळा. पूर्व आशियाने पश्चिमेची लोकशाही भांडवलशाही हाच आदर्श ठेवला आहे, किंवा पश्चिमेच्या अख्यत्यारीतील आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांनी पूर्व आशियातील देशांना दुसरा पर्याय ठेवलेला नाही. (नेहरूंच्या काळातील सार्वजनिक क्षेत्राचा प्रयोग

❒

जगातील एक तृतीयांश देश अजूनही या ना त्या रूपाच्या हुकूमशाहीखाली आहेत. मग ती अमेरिकन साम्राज्यवादाने टिकवून धरलेली सौदी अरेबियाची घराणेशाही असो किंवा चिनी भांडवलशाहीने टिकवलेली उत्तर कोरियाची 'साम्यवादी' घराणेशाही असो. डेव्हिड हेल्ड व डॅनियन बेल या विचारवंतांच्या मते राष्ट्र-राज्य एका चिमट्यात सापडले आहे. एकीकडे जागतिकीकरणाचा सामना करायला ते थिटे पडत आहे तर दुसरीकडे तळागाळातल्या स्वत:च्या जनतेचे प्रश्न सोडवायला ते फार मोठे झाले आहे.

इतिहासजमा धरू.) म्हणून लेखाच्या पहिल्या भागात पाश्चात्य भांडवलशाहीच्या आजवरच्या प्रवासाची दखल घेतली आहे. दुसरे कारण म्हणजे, ही भांडवलशाही भारताशी व्यापार वाढवायला उत्सुक आहे. गेल्या सहा महिन्यांतच ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स या विकसित लोकशाही भांडवलशाही देशांचे राष्ट्रप्रमुख विमाने भरून औद्योगिक नेतृत्व घेऊन भारत भेटीला आले यावरून भारताचे वाढते महत्त्व लक्षात येते.

वर्तमान संकट

एकविसाव्या शतकाचे आगमन पाश्चात्य भांडवलशाहीच्या पथ्यावर पडले नाही. २००७-२००९ च्या आर्थिक प्रलयात अमेरिकेतील काही जुन्या व प्रतिष्ठित अर्थसंस्था तर कोसळल्याच पण जनरल मोटर्स, ख्रिस्लरसारखा बलाढ्य कंपन्यांना दिवाळखोरीपासून वाचवण्यासाठी अमेरिकन सरकारला धावून जावे लागले. युरोपमध्ये तर आणखीच मोठी उलथापालथ सुरू झाली, ती अजून आटोक्यात येण्याचे लक्षण नाही. २००८ ला आइसलँड या देशाच्या तीन मोठ्या बँका दिवाळखोर झाल्या. त्यांच्यावरच्या कर्जाची एकूण रक्कम देशाच्या उत्पन्नाच्या सहापट होती. २०१० पर्यंत हा देश याचक म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दारात उभा आहे. आइसलँड पाठोपाठ ग्रीस देशाचे दिवाळे निघाले. सध्या (मध्य डिसेंबर) आयर्लंडची दिवाळखोरी कशीबशी मिटवण्याचा वित्तसंस्था, युरोपियन युनियन यांचा प्रयत्न चालू आहे. स्पेन आणि पोर्तुगाल याच माळेचे मणी असण्याची दाट शक्यता आहे.

या अर्थसंकटाच्या सुरूवातीला जागतिकीकरणाच्या विरोधकांची प्रमुख घोषणा होती - Capitalism in Crisis. ही घोषणा नंतर लगेचच Capitalism IS crisis अशी झाली. यावरून विरोधी जनमताची तीव्रता कळावी.

जागतिकीकरणामुळे बँकांसारख्या अर्थसंस्थांचे परस्परावलंबित्व देशाच्या सीमा पार करते. त्यामुळे अमेरिका व या देशांची अर्थव्यवस्था धोक्यात येण्याचा कमी-जास्त धक्का सगळ्याच जगाला बसला. युरोपमधील अशा 'आजारी' देशातून नागरिक बऱ्या देशात स्थलांतरित होऊ लागले. सगळ्याच देशांची क्रयशक्ती कमी झाली. आजारी देशांना युरोपियन युनियनतर्फे होणाऱ्या मदतीत (श्रीमंत असल्याने) जर्मनीचा वाटा मोठा असतो. पण या दातृत्वाने जर्मनीचीच अर्थव्यवस्था आता नाजुक झाली आहे. त्यांनी अपेक्षित सहभाग न ठेवल्यास 'युरो' हे युरोपचे चलनच आता कोसळते काय अशी भीती आहे. तिसऱ्या जगाच्या ज्या देशांची अर्थव्यवस्था प्रामुख्याने पश्चिमेला होणाऱ्या निर्यातीवर अवलंबून होती ते देशही उतरणीला लागले. पश्चिमेतील सगळ्याच देशांना धोरणांची दिशा तातडीने बदलावी लागली आहे. उदाहरणार्थ डिसेंबरमध्ये शिक्षणाच्या फी वाढवणे, समाजसुरक्षा व्यवस्थेत मोठी कपात करणे असे उपाय ब्रिटन करत आहे. लोकशाही (भांडवलशाही) चा जगभर प्रसार करण्याच्या बुरख्याखालच्या अमेरिकन साम्राज्यवादालाही व्यूहरचना बदलावी लागली.

पाश्चात्य भांडवलशाहीची पार्श्वभूमी

पाश्चात्य भांडवलशाहीच्या इतिहासाचे चार प्रमुख (व अनेक उप-) टप्पे मानले जातात. या प्रत्येक टप्प्यात सरकार (किंवा राष्ट्र-राज्य) आणि बाजार यांचे नाते कसे बदलत गेले आहे ते पाहणे आवश्यक आहे. म्हणून हा इतिहास. हे टप्पे पाश्चात्य विचारवंतांनी मांडलेले असल्याने त्यात पश्चिमकेंद्रितता आहे. पण एकूणच इतरत्र जगात मागच्या शतकापर्यंत मुख्यत: सरंजामशाहीच अस्तित्वात होती, त्यामुळे एक साधारण कल्पना येण्यासाठी हे टप्पे उपयोगी वाटतात.

१७७६ ते १९३०-३२ हा पहिला टप्पा. १७७६ ला अमेरिका राष्ट्र म्हणून अस्तित्वात आली आणि त्याच वर्षी बाजाराचा चिंतक ॲडम स्मिथ याचे Wealth of Nations हे अर्थतज्ज्ञांचे बायबल प्रसिद्ध झाले. तेव्हापासून ते पहिल्या महायुद्धानंतरच्या अमेरिकेच्या महामंदीपर्यंत हा टप्पा धरला जातो. या दरम्यान युरोपमध्ये नेपोलियनची रशिया-ब्रिटनविरुद्ध युद्धे १८०३-१८१५ दरम्यान झाली. १८१५ ला त्याचा पराभव झाला आणि ब्रिटन व नंतर फ्रान्स यांच्या जगभरच्या वसाहतवादाला जोर आला. भांडवलशाहीचे समर्थक १८१५ ते १९१४ हा ब्रिटिश साम्राज्याचा 'सूर्य न मावळणारा' सुवर्णकाळ मानतात. नेपोलियनची युद्धे ही भांडवलशाहीच्या इतिहासातील पहिली आणीबाणी मानली जाते. या दरम्यान अर्थकारण आणि राजकारण एकमेकापासून बऱ्यापैकी विभक्त होते. राजकीय हितसंबंध राखण्यासाठी इतर देशांशी असणाऱ्या व्यापारांवर निर्बंध घालणे आणि नवीन युद्धांसाठी करातून पैसा गोळा करणे हे राष्ट्रराज्य-बाजार यांचे नाते होते. या काळात प्रजेला सामाजिक सुरक्षा पुरवण्याची जबाबदारी सरकारवर नव्हती त्यामुळे त्यासाठी पैशाचाही प्रश्न नव्हता. १८-१९ व्या शतकात भारतासाठी भांडवलशाही दूर असली तरी नागरिकाच्या मूलभूत व दुय्यम गरजांची जबाबदारी राज्यकर्त्यांवर तेव्हाही नव्हती हा पश्चिमेशी समान धागा होता.

भांडवलशाहीचा दुसरा टप्पा १९३०-३२ ते १९८० पर्यंत मानला जातो. या काळात युरोपमध्ये कल्याणकारी राज्ये अस्तित्वात आली आणि अमेरिकेत New Deal नावाचे कल्याणकारी धोरण राबवले गेले. सरकार (किंवा राष्ट्र-राज्य) हे लोकांच्या भल्यासाठीच असते आणि बाजार हा लोकांना फसवण्यासाठीच असतो ही या पर्वाची धारणा होती. (या सुमारास आपल्याकडे स्वातंत्र्य चळवळ चालू होती. त्यातील बजाज-बिर्ला

या उद्योगपतींची गांधींशी असणारी जवळीक हा नेहमीच वादग्रस्त मुद्दा ठरलेला आहे. त्यामागेही हीच धारणा दिसते.) तोपर्यंत अनिर्बंध असणाऱ्या बाजारावर अमेरिकेत सरकारी नियंत्रण आले, तर युरोपमध्ये जनतेला मूलभूत व दुय्यम सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारने उचलली.

या टप्प्याचा अंत ७०-८० च्या दशकात झाला. त्या दरम्यान मध्यपूर्वेतून येणाऱ्या तेलाचे भाव अचानक वाढल्याने तिसरी आर्थिक आणीबाणी भांडवलशाहीपुढे आली. (इतरही काही कारणे होती.) त्यानंतरच्या, तिसऱ्या टप्प्यात मार्गारेट थॅचर (१९७९) आणि रोनाल्ड रेगन (१९८१) ब्रिटन व अमेरिकेचे राष्ट्रप्रमुख झाले. या दोघांनी आधीच्या पर्वाच्या अगदी उलट भूमिका घेतली. म्हणजे, सरकारचे बाजारावरील नियंत्रण कमी करायला सुरूवात केली, सार्वजनिक सेवांचे खासगीकरण ब्रिटनमध्ये सुरू झाले, वगैरे. सरकार विश्वासार्ह नाही, चुका केल्या तरी बाजार त्या चुकीतून शिकतो हा समज दृढ व्हायला या काळापासून सुरूवात झाली. पुढे तर सरकार विश्वासार्ह तर नाहीच पण जनहितघातक आहे, कायदे चूक आहेत, नोकरशाहीला तुच्छ मानले पाहिजे या विचारसरणीचा प्रभाव वाढला. बाजार ठरवेल ती पूर्व दिशा, सरकारने त्यात हस्तक्षेप करू नये इथपर्यंत ही विचारसरणी दुसऱ्या बुश महाशयांच्या कारकीर्दीत पोचली. सरकारने अनेक जनहितकारी सेवांतून काढता पाय घेतला. आपल्याकडचे या सुमाराचे उदाहरण म्हणजे अंबानी साम्राज्याचा जन्म आणि वाढ. ती हा दृष्टिकोन स्पष्ट करते. सरकार हा आपल्या उद्योगाच्या विकासातील अडथळा आहे आणि तो येनकेनप्रकारेण पार करावा लागेल, हे भांडवलशाहीचे धोरण राहिले. 'प्रत्येक व्यक्तीला किंमत असते, ती दिली की कोणालाही विकत घेता येते' अशा धर्तीच्या धीरूभाई अंबानींच्या विधानाची प्रतिक्रिया म्हणून रामनाथ गोयंकांनी इंडियन एक्स्प्रेसमध्ये रिलायन्सविरोधी मोहीम सुरू केल्याचे सांगतात!

वसाहतवादातील प्रत्यक्ष भौगोलिक अस्तित्वापेक्षा भूराजकीय प्रभुत्ववाद निराळा आहे. १८-१९ व्या शतकातल्या ब्रिटिश किंवा फ्रेंचांचे साम्राज्य वसाहतींवर प्रत्यक्ष नियंत्रण करत असे. आता आंतरराष्ट्रीय कायदे, तरतुदी आपल्या सोयीच्या करणे; जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा संस्था त्यासाठी निर्माण करणे; डब्ल्यूटीओसारखे करार लादणे अशी अमेरिकन साम्राज्यवादाची धोरणात्मक दिशा आहे.

बाजाराच्या स्वैर संचाराने २००७-२००९ ची आर्थिक आणीबाणी आली आणि आता भांडवलशाहीचे चौथे पर्व सुरू होत आहे.

वर्तमान विचार

आज निखळ बाजार जगात कोठे चालू आहे? तर जेथे राष्ट्र-राज्यच आस्तित्वात नाही अशा ठिकाणी. असा 'शुद्ध' बाजार अफगाणिस्तान, सोमालिया, काँगोमध्ये चालू आहे.

तेथे बळी तो कान पिळी ही अवस्था आहे. मग बळी (बलिष्ठ याअर्थी) इस्लामी मूलतत्त्ववादी असतील, परदेशी बोटी व नागरिक ओलीस ठेवून खंडणी वसूल करणारे सोमाली चांचे असतील किंवा काँगोतील सशस्त्र टोळ्या असतील. म्हणजे, राष्ट्र-राज्य अस्त पावले, तर अक्षरश: आणि अलंकारिकरीत्या अराजक माजते. हा जंगलचा कायदा काही श्रेयस्कर पर्याय नाही. म्हणजे, भांडवलशाहीच्या दुसऱ्या पर्वात सरकार नेहमीच बरोबर असते आणि बाजार नेहमीच चूक असतो ही धारणा होती. तिसऱ्या पर्वात या उलट, सरकार नेहमीच चूक असते, आणि बाजार नेहमीच बरोबर असतो ही धारणा होती. तीही टोकाला नेण्यात अर्थ नाही.

कालेटस्की या लंडनच्या 'टाइम्स' वृत्तपत्राच्या माजी संपादकानुसार चौथ्या पर्वात भांडवलशाही या इतिहासातून शिकेल. बाजार आणि सरकार दोघेही चुका करू शकतात, प्रसंगी या चुका कमालीच्या महागड्या व समाजविघातक असतात हे भांडवलशाहीने लक्षात घेणे आवश्यक आहे.

चौथ्या आणीबाणीचे कारण बाजाराचा मूलतत्त्ववाद. मुक्त बाजार आणि सक्षम सरकार एकत्र नांदूच शकणार नाहीत ही श्रद्धा यामागे होती. पण प्रत्यक्ष दिवाळखोरी आल्यावर त्या-त्या देशाच्या सरकारलाच तिजोरीतून पैसे ओतून, अपमानास्पद अटींवर आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांकडून महागडी कर्जे काढून बँका वाचवाव्या लागल्या. पण विशेष हे, की सरकारला त्यातही ग्राहकांची काळजी दिसत नाही. काळजी आहे ती संस्था वाचवण्याची. म्हणजे आपल्याकडे पतपेढ्या, सहकारी बँका रातोरात दिवाळखोर होतात आणि ठेवीदारांच्या रांगा बंद बँकेपुढे लागतात हाच प्रकार इथे झालेला आहे.

या भारत-पश्चिम तुलनेसंबंधात एक गोष्ट आवर्जून लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे भांडवलशाहीची प्रतिमा. सामान्य भारतीय व सामान्य पाश्चात्य नागरिक भांडवलशाहीकडे काय नजरेने पाहतो हे ध्यानात घ्यावे लागेल. सरसकट विधान करणे धाडसाचे ठरेल पण एकूण तुलना करता वैयक्तिक लाचखोरी, सरकारी काम करण्यासाठी किंवा कंत्राटे देण्यासाठी वैयक्तिक फायदा मिळवणे ('वैयक्तिक'मध्ये अर्थातच बेनामी, नातलग, इष्टमित्र आले) या

गोष्टी भारतीय राजकारणी, लोकप्रतिनिधी किंवा नोकरशहा पश्चिमेतील भांडवलशाही लोकशाही देशातील तशा पदाधिकाऱ्यांपेक्षा फार मोठ्या प्रमाणात करतात. थोडक्यात, भ्रष्टाचार हा भारतीय लोकशाही-भांडवलशाहीचा अविभाज्य भाग झालेला आहे. पक्षाला हवा म्हणून पैसा गोळा करण्यापासून वैयक्तिक मालमत्ता वाढवण्यापर्यंत भ्रष्टाचाराचा हा स्वैर संचार पश्चिमेत आढळत नाही.

याचा अर्थ असा अजिबात नाही की पश्चिमेतील भांडवलशाही 'स्वच्छ' आहे. व्यवस्था आपल्याला अनुकूल वळवणे दोन्हीकडे घडते. पण ते करण्याची साधने दोन्हीकडे निराळी आहेत. भारतात राजकारणी-नोकरशहा यांना सरळ लाच देऊन विकत घेणे हे साधन आहे. त्यामुळे अंबानी-राजू-राजा हा भारतीय भांडवलशाहीचा चेहरा आहे. मग लोकांचा विश्वास ना उद्योगपतींवर राहतो ना सरकारवर. पश्चिमेतील भांडवलशाहीचा भ्रष्टाचार जास्त करून संस्थात्मक असतो, वैयक्तिक नसतो. तो तात्त्विकही असतो. म्हणजे, तिसऱ्या जगाच्या दृष्टीने एखादे धोरण अयोग्य असेल तरी ते आपल्या समाजासाठी योग्य आहे या तात्त्विक निष्ठेने राजकारणी तो निर्णय घेण्याची शक्यता असते. संस्थात्मक भ्रष्टाचाराविरुद्ध पश्चिमेत सध्या असंतोषाची लाट आलेली आहे. त्या भ्रष्टाचाराचे रूप बँकांच्या व वित्तसंस्थांच्या संदर्भात पुढे पाहू.

२००७-२००९ नंतर पाश्चात्य जनतेच्या मोठ्या हिश्श्याचा सरकार-उद्योजक-वित्तसंस्था यांच्यावरील विश्वास उडाला. आपले पैसे शाबूत ठेवायला या संस्था विश्वासार्ह नाहीत पण त्यांना पर्यायही नाही या अगतिकतेतून असंतोष जन्माला आला आहे. पण जनतेच्या या हिश्श्याएवढाच, किंबहुना अधिक मोठ्या हिश्श्याचा अजूनही भांडवलशाहीवर विश्वास आहे. त्याचे कारण म्हणजे त्यांना दिसणारा भांडवलशाहीचा चेहरा भारतीयाला दिसणाऱ्या चेहऱ्यापेक्षा निराळा आहे. भांडवलशाही म्हणजे उद्यमशीलता, नाविन्याची ओढ - त्यातून नवीन संशोधन, श्रमप्रतिष्ठा, संपत्तीची निर्मिती व रोजगाराची निर्मिती हा तो चेहरा असतो. या संकल्पना म्हणजे भांडवलशाही, हे समीकरण जनसामान्यांच्या मानसिकतेत रुजवण्यात पश्चिमेतील भांडवलशाही यशस्वी झाली आहे. याचे कारण, परत, ऐतिहासिकदृष्ट्या, भांडवलशाही पश्चिमेत जन्माला आली, रुजली आणि ती सामान्यांनी वाढवली.

दुसरे नजीकच्या भूतकाळातले कारण म्हणजे साम्यवादाची भीती व तिरस्कार. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमेची रशियाचे प्रभावक्षेत्र विरुद्ध अमेरिकेचे प्रभावक्षेत्र अशी सरळ विभागणी झाली. त्यामुळे, एकतंत्री एकपक्षी साम्यवादाला (त्यात व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी, राष्ट्र-राज्याची हुकूमशाही याही गोष्टी आल्या) पर्याय काय, तर लोकशाही भांडवलशाही, ही भावना दृढ झाली.

त्याबरोबरच दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पश्चिम युरोपच्या प्रचंड हानीनंतर फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन हे देश परत एका पिढीत उभे राहिले. त्यांचे हे औद्योगिक व आर्थिक सामर्थ्य अमेरिकेचा पाठिंबा, वसाहतवादातून मिळालेला पैसा व भांडवल आणि राष्ट्र-राज्य यांच्या संयुक्त आघाडीने शक्य झाले. त्याचे श्रेय परत भांडवलशाहीला मिळाले.

यावरून 'भांडवलशाही' हा पश्चिमेत गर्हणीय शब्द का नाही हे लक्षात यावे. या पाठिंब्यावर आधारित असा प्रतिवाद केला जातो, की भांडवलशाही धोक्यात आली ती वित्तसंस्थांच्या संस्थात्मक भ्रष्टाचाराने. ही कीड काढून टाकली की परत सगळे आलबेल होईल. या दाव्यात माझ्या मते फार तथ्य नाही. संस्थात्मक भ्रष्टाचार आज बँकांमार्फत झाला, उद्या दुसऱ्या कोणत्यातरी संस्थेमार्फत होईल. तो भांडवलशाहीचाच येथील अटळ भाग आहे.

आता वित्तसंस्थांचा संस्थात्मक भ्रष्टाचार पाहू, ज्याने पाश्चात्य भांडवलशाही आणि त्याबरोबर पाश्चात्य समाजच धोक्यात आणला आहे.

अनियंत्रित आर्थिक बाजार

सप्टेंबर २००८ मध्ये जागतिक बँक व्यवस्था जवळजवळ ठप्पच झाली. सामान्यत: ही घडामोड त्यालगतच्या आधीच्या अमेरिकेतील घरांच्या कर्जाच्या गोंधळाने सुरू झाली असे मानण्यात येते. (तो गोंधळ पुढे पाहू). पण या आर्थिक महासंकटाची पाळेमुळे बऱ्याच आधी म्हणजे १९८०-९० च्या दशकात जातात. या दशकात काही बँकांनी झटपट नफ्यासाठी आर्थिक सट्टेबाजी सुरू केली. तोपर्यंत अर्थव्यवहार पुरेसे सरळ असत. उदा. कंपन्यांचे समभाग बाजारात विक्रीला आले की त्या खरेदी-विक्रीवर सरकारचे नियंत्रण असे. बँकांचे व्यवहारही अंतर्गत ऑडिटर्सच्या नजरेत असत.

१९८५ पासून अमेरिकेत काही बँकांनी सरकारी नियंत्रणाबाहेर जाऊन सट्टेबाजी सुरू केली. एका प्रकारच्या सट्टेबाजीला कायद्यानुसार अधिकृत नोंदीची जरूर नव्हती. ही सट्टेबाजी हळुहळू कमालीच्या गुंतागुंतीच्या चलनात होऊ लागली. (चलन म्हणजे financial product याअर्थी. रुपया-डॉलर असे चलन नव्हे.) या चलनांचा वास्तव जगाशी असलेला संबंध हळुहळू सुटत गेला आणि अक्षरश: 'हवेत' जुगार सुरू झाला. उदाहरणार्थ, मला घर विकत घेण्यासाठी कर्ज हवे आहे, किंवा छोटा उद्योग काढण्यासाठी कर्ज हवे आहे तर माझे घर, उद्योगातील मशिनरी, इमारत तारण राहते. घर, मशिनरी, इमारत हे वास्तव असते. या कर्जावर बँकेच्या अंतर्गत व बाहेरच्या ऑडिटर्सनी, सरकारने देखरेख ठेवणे, हे कर्ज संबंधित कायद्यानुसार आहे किंवा नाही हे तपासणे आवश्यक असते. पण १९८० च्या दशकात काही अमेरिकन बँकांनी

कायद्यातून पळवाटा तरी काढल्या किंवा सरळ कायद्याचे उल्लंघन तरी केले. त्यांच्याकडे असणाऱ्या अब्जावधी डॉलर्सच्या ठेवींवर हा जुगार झाला. ज्यांच्या ठेवी किंवा अकाऊंटस् बँकेकडे आहेत, त्या कंपन्यांना या चलनांच्या क्लिष्टतेमुळे आपले पैसे बँक कसे वापरत आहे, हेच कळत नव्हते. कंपन्यांच्या समभाग धारकांना तर कंपनी अशा आर्थिक व्यवहारात गुंतलेली आहे, हे माहितीच नव्हते. उदाहरणार्थ प्रॉक्टर अँड गँबल ही एक मोठी बहुराष्ट्रीय कंपनी आहे. ती साबणाची पावडर, टूथपेस्ट, काही सौंदर्यप्रसाधने बनवते. (एरिअल, फेअरी वगैरे ब्रँड नावाने). बँकर्स ट्रस्ट नावाच्या बँकेने १९९० च्या दशकाच्या सुरूवातीला प्रॉक्टर अँड गँबलला बाजाराहून स्वस्त व्याजदराने पैसा कसा उभा करू शकेल याचा एक प्रस्ताव दिला. त्यानुसार, प्रथम प्रॉक्टर अँड गँबल बँकेला काही पैसा देणार, बँक त्यावर आंतरराष्ट्रीय बाजारात सट्टेबाजी करणार, सट्टेबाजीतून होणाऱ्या नफ्यावर बँक काही टक्के कमिशन घेणार आणि उरलेला पैसा कंपनीला स्वस्त व्याजाने मिळणार. एकूण सट्टेबाजी काही लाख डॉलर्सची असल्याने कंपनीला पुरेसा पैसा स्वस्त व्याजाने मिळेल. सट्टेबाजीत तोटा झाल्यास कंपनीला फारशी झळ पोचणार नाही असे कंपनीला सांगण्यात आले. पण तोटा झाला तरी बँकेला काहीच झळ पोचणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली. या सगळ्या व्यवहाराची कंपनीच्या कित्येक उच्च अधिकाऱ्यांनाही कल्पना नव्हती. कंपनीच्या फायनान्स डिपार्टमेंटमधल्या एक-दोघांनी हा व्यवहार बँकर्स ट्रस्टच्या एक-दोन अधिकाऱ्यांबरोबर केला. ज्यांनी हा व्यवहार केला, त्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनाही आपण नक्की कशावर सह्या करत आहोत, याची माहिती असणे संभवनीय नव्हते. कारण हे चलनच क्लिष्ट आणि 'नवीन' होते. त्यामुळे त्यातला धोकाही त्यांना माहिती नव्हता. मग समभागधारक तर दूरच राहिले. समभागधारकांची समजूत अशी की त्यांनी साबण बनवणाऱ्या कंपनीत पैसे गुंतवले आहेत. त्यांनी गुंतवलेल्या पैशाला जुगारी वाटा लाभल्या आहेत हे त्यांना माहितीच नव्हते. कंपनीने ते सांगण्याची तसदी घेतली नाही. सरकारी देखरेखीचीही हीच अवस्था होती कारण वर म्हटल्याप्रमाणे काही चलनांचे (परत, financial product या अर्थी; रुपया-डॉलर या अर्थी चलन नव्हे) व्यवहार तत्कालीन कायद्याच्या कक्षेबाहेरच होते. शेवटी प्रॉक्टर अँड गँबलचा हा जुगार फसला. पण बँकेला कमिशन मिळाले. ज्या अधिकाऱ्याने हा व्यवहार केला, त्याला कोट्यवधी डॉलर्सचा वैयक्तिक बोनस मिळाला. मग प्रॉक्टर अँड गँबलने बँकर्स ट्रस्टला कोर्टात खेचले. तेव्हा कोठे १९९६ साली हा प्रकार उघड झाला.

उजव्या शक्ती जशा आपल्या ध्येयाबाबत स्पष्ट विचार करून कार्यक्रम आखतात, तसा वैचारिक नि:संदिग्ध दृष्टिकोन डाव्या किंवा अ-उजव्या चळवळीत दिसत नाही. प्रागतिक विचारसरणीच्या चळवळीत वैचारिक गोंधळ असतो कारण ही परिस्थिती का उद्‌भवली याचे प्रत्येक प्रागतिक चळवळ वेगळे उत्तर देते. त्यात वावगे काही नाही पण त्यामुळे अशा चळवळींचे किमान कार्यक्रमावर एकत्र येणे अवघड होते आणि भांडवलशाही या चळवळींना एकमेकांत झुंजत ठेवण्यात यशस्वी होते.

प्रॉक्टर अँड गँबल खासगी क्षेत्रातील कंपनी. पण बँकर्स ट्रस्टसारख्या इतर बँकांनी हे 'नवीन' व्यवहार अमेरिकेत अनेक नगरपालिकांच्याही गळी मारले. १९८५ ते २००५ पर्यंत हे गैरव्यवहार चालू होते. या काळात आंतरराष्ट्रीय बाजारात रुपया, पौंड, जपानी येन, अमेरिकन डॉलर अशा चलनांवरची सट्टेबाजी ही तर बँकांना सापडलेली सोन्याचे अंडे देणारी कोंबडी झाली.

याच बँकर्स ट्रस्ट बँकेच्या आंतरराष्ट्रीय चलनाच्या विभागातील एक कर्मचारी एक विशिष्ट सट्टा करत असे. न्यूझीलंडच्या चलनाचा (Currency या अर्थी) दर अमेरिकन डॉलर्सच्या मानाने वर जाईल का खाली येईल यावर हा सट्टा असे. हा कर्मचारी काही कोटी डॉलर्स चलनाचा दर वर जाईल या शक्यतेवर लावत असे. चलनाचा दर खाली गेला तर बँकेचा तोटा होणार नाही एवढी खबरदारी घेण्यात आली होती. मात्र, दर वर गेला तर फायदा होणार याची खात्री होती. या सट्ट्याच्या प्रमाणाचा अंदाजही येणे कठीण होते. एक वेळ तर अशी आली की न्यूझीलंड देशाचा संपूर्ण चलनपुरवठा हा एक कर्मचारी ठरवत होता. ही गोष्ट १९८७ सालची. हा जुगार इतका टोकाला गेला होता, की तो देश या एका माणसाच्या कॉम्प्युटरच्या क्लिकने दिवाळखोर होऊ शकला असता.

तरीही कोणी जागे झाले नाही. फुगवलेल्या आकड्यांचे नफे बँका दाखवत राहिल्या; कंपन्या तोटा झाला तर लपवत राहिल्या. २००५ साली हे हवेतले मनोरे खाली आले. असेच गैरव्यवहार फ्रान्स, ब्रिटनमध्ये बँकांनी केले आहेत. त्यावेळी अमेरिकेतील गृहकर्जांच्या वाटपातील गोंधळही शिगेला पोचला होता. त्याचा थोडक्यात आढावा घेऊ म्हणजे हे आर्थिक अराजक कुठपर्यंत गेले होते ते कळेल.

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात घरांसाठी कर्जपुरवठा हव्या त्या वेगाने होत नाही असे बँकांच्या लक्षात आले. कमी कर्जवाटपामुळे बँकांच्या नफ्यावर परिणाम होत होता. मग बँकांनी

कर्जपुरवठ्याचे नियम शिथिल केले. आपल्याकडे, समजा एखाद्याला एचडीएफसीकडून कर्ज घ्यायचे असेल तर अनेक हमी, तारण, विमा वगैरे असल्याखेरीज कर्ज मिळत नाही. असेच नियम आधी अमेरिकन बँकांत रूढ होते. ते शिथिल करण्यात आले. म्हणजे, ज्या लोकांना कायमची नोकरी नाही, ज्यांची पुरेसे तारण देण्याची ऐपत नाही किंवा सध्याच्या मिळकतीतून ज्यांना कर्ज परत करणे शक्य नाही अशाही लोकांना कर्जवाटप करण्यात आले. त्यामुळे स्वत:चे घर असणाऱ्या लोकांची संख्या अमेरिकेत २००४ दरम्यान एकदम वाढली. कर्जवाटप करताना बँकांनी ग्राहकांना पूर्ण जोखमीची कल्पनाही दिली नाही. बहुतेक कर्जांचा व्याजदर पहिली दोन वर्षे अगदी कमी ठेवण्यात आला होता. त्यामुळे कर्ज घेणे आकर्षक झाले. दोन वर्षांनंतर हा व्याजदर वाढणार होता. ज्यांना स्वत:च्या मालकीचे घर आयुष्यात कधी घेणे शक्य नव्हते, त्या लोकांनी भराभरा ही कर्जे काढली. घरांच्या किंमतीही वाढत होत्या. लोकांनी असा विचार केला की कर्ज काढून घर तर घेऊ मग दोन वर्षांनी हप्ता वाढायच्या आत ते चढ्या किंमतीला विकून टाकू. मग दुसरे, जरा स्वस्तातले, आपल्याला हप्ता परवडेल असे घर घेऊ. प्रत्यक्षात वर्षभरातच घरांच्या किंमती वाढणे थांबले आणि कर्जाच्या अटीनुसार परतफेडीचे हप्ते मात्र (व्याजदर बदलल्याने) वाढले. म्हणजे, समजा, सुरूवातीला हप्ता दरमहा ६०० डॉलर्स होता तर दोन वर्षांनी तो एकदम १५०० डॉलर्सवर गेला. एवढा हप्ता भरणे घरमालकाला शक्य नव्हते आणि घरही विकले जात नव्हते. शेवटी मोठ्या प्रमाणात बँकांना घरे ताब्यात घ्यायला लागली आणि दोघांचाही तोटाच झाला. लोक बेघर झाले आणि सामाजिक अशांतता वाढली. बेघरांचे सामाजिक चित्र पाहण्यासारखे आहे. कर्जे प्रामुख्याने घेतली ती समाजाच्या खालच्या आर्थिक स्तरातील लोकांनी. त्यात कृष्णवर्णीय, एकट्या माता यांची संख्या प्रचंड होती. आणि अल्पावधीत त्यांच्यावरच बेघर होण्याची वेळ आली.

याचे आर्थिक परिणाम अक्षरश: दूरगामी झाले. वर म्हटल्याप्रमाणे जगभरच्या अनेक बँकांची एकमेकांच्या कर्जवाटपात गुंतवणूक असते. सुरवात अमेरिकेत झाली आणि लेमन ब्रदर्स, फ्रेडी मॅक्सारख्या वॉल स्ट्रीटवरच्या मोठ्या आर्थिक संस्था कोसळल्या. त्यांनी काही युरोपियन बँकाही धोक्यात आणल्या, काही दिवाळखोरही झाल्या. मग कोठे जगभरातली सरकारे जागी झाली. अमेरिकन सरकारने तिजोरीतून पैसा घालून, म्हणजे करदात्याचा पैसा वापरून काही अर्थसंस्था वाचवल्या. हे गैरव्यवहार अर्थसंस्थांनीच केले असे नाही. बर्नार्ड मॅडॉफ नावाच्या आर्थिक दलालाने एकट्याने जगाच्या इतिहासातील सगळ्यात मोठी गंडवागंडवी केली. १९८० चे दशक ते पुढची २०-२५ वर्षे या गृहस्थाने एकाचा पैसा घेऊन दुसऱ्याला देणे हे प्रकार इतक्या मोठ्या प्रमाणावर केले की त्यातील तोटा सुमारे १८ बिलियन डॉलर्स असावा. त्याने जगातील कित्येक अतिश्रीमंत तर दरिद्री केलेच पण काही सरकारे, काही बँकाही धोक्यात आणल्या. २००९ ला मॅडॉफला या आर्थिक गुन्हेगारीसाठी १०० वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्याच्याबरोबर त्याची दोन मुले काम करत असत. त्यातल्या एकाने ११ डिसेंबर २०१०ला आत्महत्या केली. आपल्याकडचे हर्षद मेहता प्रकरण याच सुमाराचे.

सामान्य समजूत गृहकर्जांमुळे आर्थिक प्रलय आला ही आहे. वस्तुस्थिती तशी नाही म्हणून वरची पार्श्वभूमी विस्ताराने दिली आहे.

१९८० पासून जगात चार महत्त्वाची स्थित्यंतरे झाली. हे आर्थिक संकट त्या संदर्भात पहावे लागेल. एकतर रशियाच्या विघटनाबरोबर साम्यवाद या राज्यव्यवस्थेचा आणि आदर्शवादाचा अस्त झाला. त्यामुळे लोकशाही भांडवलशाहीला उन्माद झाला. आशिया जागतिक पटलावर उदयाला आला आणि भांडवलाला नवीन वाटा मिळाल्या. इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाने माहिती, दळणवळणाबरोबरच आर्थिक क्षेत्रातही क्रांती केली आणि इलेक्ट्रॉनिक पैशाचा जन्म झाला. हा पैसा सोने, चांदी, परकीय चलनांचे साठे अशा 'वास्तव' आधारावर अवलंबून नव्हता. वर दिलेली बँकेची सट्टेबाजी derivatives नावाच्या अशा इलेक्ट्रॉनिक पैशावर झाली. हा इलेक्ट्रॉनिक पैसा एका बँकेने आणखी दहा बँकांकडून उभा केला होता. जेव्हा तो धोक्यात आला, किंवा दिलेली कर्जे जेव्हा धोक्यात आली, तेव्हा आपण कर्जवाटप केले असले तरी आपल्यावर कर्जाचा बोजा किती आणि आपल्याला पैसे देणाऱ्या बँकांवर कर्जाचा बोजा किती हे कोणालाच नक्की सांगता येईना. या अनिश्चिततेमुळे बँकांनी एकमेकांना पैसे देणे थांबवले. यामुळे पैशाच्या विनियोगाशी भांडवलाचे असणारे स्पर्धात्मक व सकारात्मक नाते तुटले आणि भांडवल व पर्यायाने भांडवलशाही धोक्यात आली.

भांडवलशाही साम्राज्यवाद

भांडवलशाहीवरील या विवेचनानंतर आता भांडवलशाही साम्राज्यवादाकडे वळू. प्रथम एक किस्सा सांगण्यासारखा आहे. इराक युद्धाची तयारी दुसऱ्या बुशचे सरकार २००२ च्या उन्हाळ्यात जोमाने करत होते. त्यावेळी एक पत्रकार या राजवटीतील एका ज्येष्ठ सल्लागाराला भेटला. त्या सल्लागाराने अमेरिकन राजवटीची तात्त्विक भूमिका पुढील शब्दांत स्पष्ट केली- ''तुमच्यासारख्या लोकांच्या (म्हणजे पत्रकारांच्या) श्रद्धा वास्तवाधिष्ठित असतात. म्हणजे, तुम्हाला असे वाटते की वास्तवाचा आपण निष्पक्षपाती अभ्यास केला, तर प्रश्नांना उत्तरे सापडतील. पण जग असे चालत नाही. आम्ही (अमेरिका) आता साम्राज्य आहोत आणि आम्ही जेव्हा काही कृती करतो, तेव्हा

आम्ही आमचे स्वत:चे वास्तव निर्माण करतो. तुम्ही या वास्तवाचा अभ्यास, भले अगदी निष्पक्षपातीपणे करत आहात, तोपर्यंत आम्ही नवी कृती करतो, नवी वास्तवे निर्माण करतो. जग आता असे चालेल. आम्ही इतिहास घडवू. तुम्ही फक्त त्याचा अभ्यास कराल.''

'आम्ही वास्तव निर्माण करतो' हा दंभ भांडवलशाही साम्राज्यवादाच्या मुळाशी आहे. ॲलेक्स कॉलिनिकोस या विचारवंताच्या मते भांडवलशाही साम्राज्यवाद हे दोन प्रकारच्या स्पर्धांचे एकत्रीकरण आहे. एक आर्थिक स्पर्धा आणि दुसरी भूराजकीय स्पर्धा. शेजारच्या बँकेपेक्षा माझ्या बँकेने जास्त नफा करावा म्हणून नवी चलने (financial product या अर्थी) शोधली गेली. ती आर्थिक स्पर्धा वर पाहिलीच.

भूराजकीय स्पर्धा आर्थिक स्पर्धेच्या आधीपासून चालू आहे. सुरक्षा, भौगोलिक प्रदेश, प्रभावक्षेत्र हे भूराजकीय सामर्थ्याचे घटक आहेत. युरोपमधील, भारतातील मध्ययुगीन साम्राज्ये एकमेकांशी भूराजकीय स्पर्धेत होती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भूराजकीय आणि आर्थिक या स्पर्धा एकत्र आल्या. त्याने वसाहतवाद कसा वाढला हे आधी पाहिलेच आहे. दुसऱ्या शब्दांत, भांडवलशाही साम्राज्यवाद हा राष्ट्र-राज्य आणि भांडवल यांचा संयुक्त प्रकल्प आहे. भांडवल म्हणजे, या संदर्भात, फक्त पैसा नव्हे तर पैशाच्या विनियोगाशी असलेले सत्तेचे नाते असा मानता येईल.

अमेरिकन साम्राज्यवादाचे उदाहरण म्हणून इराक युद्ध घेऊ. युद्ध लादण्यासाठी तीन प्रमुख कारणे सांगण्यात आली. ती तीनही खोटी होती हे लगेचच सिद्ध झाले. सद्दाम हुसेनची राजवट आणि अल्-कईदा यांचे परस्परसंबंध आहेत, सद्दाम हुसेनकडे अण्वस्त्रक्षमता आहे आणि मध्यपूर्वेत लोकशाही आणण्याचा अमेरिका-ब्रिटनचा उदात्त हेतू आहे. ही ती कारणे होती. वस्तुत: अल्-कईदा-सद्दाम यांचे संबंध असलेच तर परस्परद्वेषाचे होते, इराककडे अण्वस्त्रक्षमता कधीच नव्हती आणि आक्रमणानंतर सात वर्षे झाली तरी खऱ्या लोकशाहीची इराकमध्ये चिन्हे नाहीत.

मग खरी कारणे काय होती? तर वर म्हटल्याप्रमाणे आर्थिक स्पर्धा. चीन, भारत व पूर्व आशियातील इतर राष्ट्रांवर कुरघोडी करण्यासाठी इराकच्या तेलावर नियंत्रण मिळवणे. (युद्ध अमेरिकन जनतेला आणि राजकीय विरोधकांना 'विकण्यासाठी' युद्धाआधी पुढील हिशोब सादर करण्यात आला होता - इराकचे तेल विकून युद्धाचा खर्च तर निघेलच पण इराकच्या पुनर्निमितीची कंत्राटे अमेरिकन कंपन्यांनाही मिळतील. यातील कंत्राटे मिळाली, पहिला अंदाज साफ फसला.) म्हणजे तेलावर नियंत्रण हा भांडवलशाही साम्राज्यवादाचा आर्थिक भाग झाला. भूराजकीयदृष्ट्या मध्यपूर्वेत आपले बस्तान बसवण्यामागे चीन व इतर उगवत्या महासत्तांना इशारा होता की तुम्ही जगाच्या नवीन भागात जात असाल, तर आम्ही आधीच तेथे आहोत. इराण तर अमेरिकेचा शत्रू आहेच. त्याच्या शेजारीच ठाण मांडणे हा दुसरा हेतू होता. आर्थिक आणि भूराजकीय स्पर्धा अशी एकत्र आली.

या मार्गावर पुढची वाटचाल कठीण आहे. कारण अर्थप्रलयाने सुरू झालेली आर्थिक मंदी लवकर संपेल असे दिसत नाही. दुसरे म्हणजे, लेखाच्या अगदी सुरूवातीलाच म्हटल्याप्रमाणे भांडवलशाहीची तीन केंद्रे आहेत. एक अमेरिका, दुसरे पश्चिम युरोप आणि तिसरे पूर्व आशिया (चीन, भारत, द. कोरिया, वगैरे). या तीन केंद्रांमध्ये स्पर्धा आहेच. त्यामुळे 'जागतिक भांडवलशाही' अशी एक संकल्पना कठीण आहे. तिसरी मर्यादा म्हणजे अमेरिकन भांडवलशाही इतर दोन केंद्रांपेक्षा जरी आक्रमक असली, तरी अमेरिका व इतर देशांच्यातील संबंध ताणले जात आहेत. उदाहरणार्थ, अमेरिका-चीन किंवा अमेरिका-रशिया यांच्यातील रस्सीखेचीने नवीन भूराजकीय संघर्ष निर्माण होत आहेत.

वसाहतवादातील प्रत्यक्ष भौगोलिक अस्तित्वापेक्षा भूराजकीय प्रभुत्ववाद निराळा आहे. १८-१९ व्या शतकातल्या ब्रिटिश किंवा फ्रेंचांचे साम्राज्य वसाहतींवर प्रत्यक्ष नियंत्रण करत असे. आता आंतरराष्ट्रीय कायदे, तरतुदी आपल्या सोयीच्या करणे; जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा संस्था त्यासाठी निर्माण करणे; डब्ल्यूटीओसारखे करार लादणे अशी अमेरिकन साम्राज्यवादाची धोरणात्मक दिशा आहे. उदाहरणार्थ आपल्या शेतकऱ्यांना सवलती देणे व स्वस्त माल निर्यात करणे (तो जेथे जातो तिथल्या शेतकऱ्यांवर याचा अनिष्ट परिणाम होतो) किंवा तिसऱ्या जगातील नवीन तंत्रज्ञान, विज्ञान यांच्या संशोधनाला आळा घालणे ज्यायोगे केवळ अमेरिकेतील तंत्रज्ञच तंत्रज्ञान विकसित करतील. मग जागतिक बाजारपेठेत 'अमेरिकन तंत्रज्ञान' म्हणून ते विकता येईल; वगैरे. ही आंतरराष्ट्रीय संदर्भचौकट अर्थातच अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्यावर आधारित आहे. तो बडगा इराकसारख्या ठिकाणी दाखवला जाईल किंवा इतरत्र सुप्त रूपात राहील. पण त्याच्या पायाखेरीज हा डोलारा टिकणे अशक्य आहे. अफगाणिस्तान-इराकमधील पडझडीने अमेरिका संकटात येण्याचे हे प्रमुख कारण आहे. कारण वास्तव निर्माण करण्याची अमेरिकेची क्षमताच आता संशयास्पद आहे.

आजवर प्रामुख्याने अशी रचना निर्माण करण्यात आली जेणेकरून व्यापार शाबूत राहील. उदाहरणार्थ इराकी तेलावर उघड उघड नियंत्रण अमेरिकेचे नसेल. बहुराष्ट्रीय कंपन्या एकमेकांशी स्पर्धा करतील आणि तेलाच्या उत्पादनाची कंत्राटे मिळवतील. अमेरिका ही स्पर्धा 'मुक्त' बाजारात घडेल असे वातावरण निर्माण करेल. त्यामागचे गृहीत व अपेक्षा अशी की हा 'मुक्त' बाजार अमेरिकेलाच फायदेशीर असेल. हा भूराजकीय

प्रभाव आहे.

हा प्रभाव दीर्घकालीन अबाधित रहावा म्हणून इतर भांडवलशाही देशांनाही या भूराजकीय क्षेत्रात माफक शिरकाव करता येईल इतपत काळजी अमेरिका घेते पण परत, त्या शिरकावाची मर्यादा अमेरिकाच ठरवते. १९९४ ला मेक्सिकोत आर्थिक अराजक आले. तेव्हा मेक्सिकोला वाचवण्यासाठी तेव्हाच्या जी-७ या विकसित, औद्योगिक देशांच्या संघटनेवर अमेरिकेने दडपण आणले आणि मेक्सिकोला मदत करायला लावली. कारण अमेरिकन गुंतवणूकदारांचे हितसंबंध मेक्सिकोत अडकले होते आणि त्यांचा पैसा धोक्यात आला होता. म्हणजे, मेक्सिको देशाला वाचवण्यापेक्षा अमेरिकन भांडवल सुरक्षित राखण्यासाठी इतर भांडवलशाही देशांना भाग पाडण्यात आले. त्यामुळे त्यावेळी अमेरिकेचे ब्रिटन आणि जर्मनीशी संबंधही ताणले गेले होते. अमेरिकेने आपल्या तिजोरीतूनही हे भांडवल राखण्यासाठी मेक्सिकोत पैसा ओतला तो अर्थातच अमेरिकन करदात्याचा होता. त्या व्यवहारात वित्तसंस्थांनी, करदात्याने नव्हे, ५० कोटी डॉलर्सचा नफा केल्याचे नंतर उघड झाले.

१९९७-९८ ला पूर्व आशियात मेक्सिकोसारखी आर्थिक आणीबाणी आली होती. थायलंडपासून सुरूवात होऊन इंडोनेशिया, दक्षिण कोरिया व इतरही देश त्यात ओढले गेले. तेव्हा जपानने पुढाकार घेतला. एशियन मॉनेटरी फंड या संघटनेने या देशांमध्ये हस्तक्षेप करावा आणि अर्थव्यवस्था ताळ्यावर आणावी असा प्रस्ताव होता. तसे झाले असते तर अमेरिकेच्या नियंत्रणाखालील आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या वित्तसंस्थेचा प्रभाव या प्रदेशात मर्यादित राहिला असता. म्हणून जपानचा प्रस्ताव अमेरिकेच्या नेतृत्वाखाली विकसित देशांनी हाणून पाडला. सांगायला सबब पाहिजे म्हणून या देशांमध्ये खुल्या बाजाराला अनिष्ट अशी सरकार-बँका-उद्योग अशी हातमिळवणी असते असा युक्तिवाद करण्यात आला. (यामागे वंशद्वेषही होता कारण राष्ट्र-राज्याचे संपूर्ण अनियंत्रण हेच सध्याच्या अर्थसंकटाचे कारण आहे.) मग आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने या देशांना उदारीकरणाचे धोरण स्वीकारायला भाग पाडले, दुसऱ्या शब्दांत अमेरिकन भांडवल येथे अधिक जोमाने येईल अशी तरतूद केली.

आता भांडवलशाही साम्राज्यवाद भूराजकीय प्रभुत्ववाढीसाठी लष्करी बळाचा कसा वापर करतो ते पाहू. हे उदाहरण क्लिंटन राजवटीतले आहे, म्हणून महत्त्वाचे आहे. आजच्या ओबामा राजवटीसारखीच ती डेमोक्रॅटिक पक्षाची राजवट तिसऱ्या जगाला सहानुभूत असेल अशी अपेक्षा होती.

सोविएत रशियाच्या विघटनानंतर अनेक नवी राष्ट्रे जन्माला आली. १९९०-९१ ला संबंधित तीन प्रमुख राष्ट्रांनी भविष्यातील

सुरक्षाव्यवस्थेबाबत वाटाघाटी केल्या. त्यात रशियाचे तेव्हाचे अध्यक्ष गोर्बाचेव्ह, पश्चिम जर्मनीचे चॅन्सेलर हेल्मुट कोल आणि अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जेम्स बेकर सहभागी होते. प्रमुख मुद्दा NATO या संघटनेच्या आगामी भूमिकेचा होता. (दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमध्ये कम्युनिस्ट राष्ट्रे विरुद्ध लोकशाही राष्ट्रे अशी सरळ विभागणी झाली होती. लोकशाही राष्ट्रांना रशियापासून सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली NATO चा जन्म झाला. त्यात ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी वगैरे पश्चिम युरोपातील देश आहेत.) त्या वाटाघाटीत असे ठरले की तोपर्यंत कम्युनिस्ट आणि रशियाच्या प्रभावाखाली असणारा पूर्व जर्मनी व लोकशाही असणारा पश्चिम जर्मनी हे दोन्ही देश NATO मध्ये राहतील. त्या बदल्यात NATO इतर कम्युनिस्ट देश किंवा रशियातून फुटून निघालेले देश यांमध्ये ढवळाढवळ करणार नाही किंवा त्यांना NATO मध्ये आणण्याचा प्रयत्नही करणार नाही.

हा निर्णय नंतर क्लिंटन राजवटीत (१९९३ ते २००१) फिरवला गेला आणि अमेरिकेची 'सीमा' रशियाला भिडवण्याचा प्रयत्न सुरू झाला. या प्रदेशात रशियातून बाहेर पडलेले युक्रेन, जॉर्जिया वगैरे चौदा देश आहेत. त्यातील निम्म्या देशांत अमेरिकन सैन्यतळ उभारण्यात आले आहेत किंवा नियोजित आहेत. त्यामुळे रशिया-अमेरिका संघर्ष, विशेषत: आक्रमक पुतीनच्या नेतृत्वाखाली तीव्र होऊ लागला आहे. २००८ ला या संघर्षाचा उद्रेक जॉर्जिया या आधीच्या सोविएत रशियातून बाहेर पडलेल्या देशात झाला. जॉर्जियाच्या सैन्याचे प्रशिक्षण अमेरिका आणि इस्रायल करतात. त्या जोरावर रशिया-जॉर्जिया सीमेवरील एका स्वायत्त प्रदेशावर जॉर्जियाने हक्क दाखवण्यासाठी लष्कर घुसवले. मग रशियाने युद्ध सुरू करून पाच दिवसांत तो प्रदेश परत स्वायत्त केला आणि सीमेवर सैन्य तैनात केले. अमेरिकन साम्राज्यवादाला हे उत्तर मिळाले.

रशियाबरोबरच चीनला 'वेढण्या'चाही प्रयत्न अमेरिकन भांडवलशाही साम्राज्यवाद करतो. जपान, दक्षिण कोरिया हे चीनच्या भौगोलिक सान्निध्यातील देश तर अमेरिकेला अनुकूल आहेतच पण या डावपेचात भारतही महत्त्वाचा आहे. त्यामुळे २००६ साली भारताशी अणुकरार करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीवर भारताची नेमणूक व्हावी यालाही त्यामुळेच अमेरिका, फ्रान्स पाठिंबा देत आहेत. चीन-अमेरिका संबंधांत तैवानचे अस्तित्व हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तैवान चीनचा भाग आहे या चिनी दाव्याला अमेरिकेचा विरोध आहे. या प्रश्नात संघर्षक्षमता आहे.

या साऱ्या चित्रात चीनचा बागुलबुवा अमेरिका वाढवत आहे अशी रास्त शंका येणे शक्य आहे. पण, आगामी काळात, चीन-

अमेरिका संबंध भांडवलशाही-साम्राज्यवादाची दिशा ठरवतील असा पश्चिमेत विचारप्रवाह आहे. भांडवलशाहीचे समर्थक व विरोधक दोघांचेही याबाबत एकमत आहे. मात्र, त्यासाठी चीनचे खरे चित्र तपासणे जरूरीचे आहे. आजवरची चीनची प्रगती भांडवलशाहीच्या विकासाची पहिली पायरी मानता येईल. वीज, पाणी, रस्ते या पायाभूत सुविधा निर्माण झाल्या, आजवर प्रामुख्याने इतरत्र विकसित झालेल्या तंत्रज्ञानाची नक्कल करून उत्पादने करण्यात येत आहेत आणि अर्थव्यवस्थेचा भर निर्यातीवर आहे. या निर्यातीचे ग्राहक देश आता आर्थिक मंदीत आहेत. हा घटक वाढीला आळा घालू शकतो. अंतर्गतदृष्ट्याही, एकतंत्रीय राजवटीचे इतर परिणाम पहावे लागतील. एकतर लोकांचे जीवनमान वाढले की उपभोक्ता संस्कृतीचा उदय होतो. त्याबाबत राजवट नियंत्रणे वाढवू शकते व संघर्ष होऊ शकतो. दुसरे म्हणजे, तंत्रज्ञानाच्या विकासाला लागणारा मुक्तपणा चीनमध्ये कितपत आहे हे साशंक आहे. प्रातिनिधिक सरकार, मालमत्तेवरचे कायदेशीर हक्क, सरकारी ढवळाढवळ नसलेली स्वतंत्र न्यायव्यवस्था या पश्चिमेची भांडवलशाही पुढे नेण्यासाठी आवश्यक गोष्टी होत्या. आजवर यांच्याखेरीज चीनने विकास रेटला आहे. पण अंतर्गत विषमतेमुळे वाढणारी सामाजिक अशांतता आहे त्या व्यवस्थेत (म्हणजे सत्तेची मक्तेदारी, आचार-विचार स्वातंत्र्याचा अभाव इत्यादी) वाढतच जाणार.

चीनचा विकास गेल्या तीस वर्षांत दैदिप्यमान असला तरी दरडोई उत्पादनात चीन १३० देशांत ९७ क्रमांकावर आहे. (अमेरिका ४६,००० डॉलर्स, चीन ६,५०० डॉलर्स). चिनी जनतेची आयुमर्यादाही विकासाच्या प्रमाणात वाढलेली दिसत नाही. ती वाढली, तरी नजीकच्या भविष्यात निराळे प्रश्न येतील. 'एकच मूल' या धोरणामुळे राष्ट्र-राज्यावर अवलंबून असणारे वृद्धांचे प्रमाण वाढेल. भारतात या उलट परिस्थिती होईल. या संदर्भात चीनचा विकास पर्यावरणाला हानिकारक झाला आहे व होत आहे हेही नमूद करायला हवे. शहरातील अशुद्ध हवा, नद्या व जलप्रवाहांत सोडण्यात येणारी औद्योगिक रसायने, जमिनीखालच्या पाण्याची खाली जाणारी पातळी, कोळशापासून वीज बनवणे, सिमेंटचे प्रदूषण करणारे कारखाने बनवणे असे या हानीचे अनेक पैलू आहेत. (ऑगस्ट २००८ च्या 'आंदोलन'मध्ये मी याचा सविस्तर आढावा घेतला आहे.)

भांडवलशाही साम्राज्यवादाच्या या चर्चेनंतर जागतिकीकरण-बहुराष्ट्रीय कंपन्या याबाबतचे काही रूढ समज तपासून पाहू.

एकतर, जागतिकीकरण म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा मुक्त संचार असा समज आहे. वस्तुत: मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या भौगोलिक प्रदेशातच बहुतेक विक्री करतात. जागतिकीकरणविरोधी

एक सूर असा असतो की अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्या जागतिकीकरणाचे, पर्यायाने साम्राज्यवादी भांडवलशाहीचे धोरण ठरवतात. पण जगातल्या सगळ्यात मोठ्या पन्नास बहुराष्ट्रीय कंपन्यांपैकी २५ (कॅनडा धरून) उत्तर अमेरिकेत आहेत, १५ युरोपमध्ये आहेत तर १० आशियात आहेत. हे तीनही प्रदेश धोरणाबाबत एकमेकांपासून स्वायत्त असतात. उत्पादनाचे तंत्रज्ञानही सारख्याच पातळीवर किंवा प्रकारात विकसित झालेले दिसत नाही. या तीन प्रमुख प्रदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्या आपले तंत्रज्ञान आपणच विकसित करतात आणि उत्पादन आपल्याच प्रदेशात विकतात.

फारच थोड्या कंपन्या खरोखर जगभर तोच माल विकतात. त्या अर्थाने, एका अभ्यासानुसार, फक्त नऊ कंपन्या बहुराष्ट्रीय म्हणता येतील.

या कंपन्या वरील प्रत्येक प्रदेशात (अमेरिका, युरोप व आशिया) किमान २० टक्के विक्री करतात व कोणत्याही एका प्रदेशात त्यांची विक्री ५०%हून जास्त जात नाही. या नऊ कंपन्या अशा - आयबीएम्, सोनी, फिलिप्स, नोकिया, इंटेल, कॅनन, फ्लेकस्ट्रॉनिक्स, ख्रिस्तिअन दिओर आणि कोका-कोला. यातील ख्रिस्तिअन दिओर कॉस्मेटिक उत्पादने करते, कोका-कोला कोका-कोला बनवते. उरलेल्या सात कंपन्या कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक किंवा इलेक्ट्रिकल क्षेत्रात आहेत. त्या खऱ्या अर्थाने जागतिक होण्याचे एक कारण म्हणजे त्यांची उत्पादने अवजड नसतात. म्हणून वाहतूक सुलभ आणि कमी खर्चाची असते. उदाहरणार्थ कॅननचा कॅमेरा किंवा सोनीचा टी.व्ही.

जागतिकीकरणावर सरसकट टीका करताना या आकडेवारीचे भान ठेवले पाहिजे कारण बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भांडवल आता भौगोलिक मर्यादा अनियंत्रितरीत्या ओलंडत आहे हे गृहीतक बरोबर दिसत नाही. स्वस्त कामगारांसाठी प्रगत देशातील कारखाने मोठ्या प्रमाणावर तिसऱ्या जगात येत आहेत हे गृहीतकही प्रत्यक्षात खरे दिसत नाही. चीन, भारत, मेक्सिको, पूर्व युरोप येथील कामगारांचे वेतन कमी असले तरी उत्पादनक्षमताही कमी असते. ऑक्टोबर २००६ च्या एका अभ्यासानुसार मेक्सिको देशातील वेतन अमेरिकेतील वेतनाच्या एक दशांश होते. पण मेक्सिकन कामगाराची उत्पादनक्षमताही एक दशांश होती. म्हणजे मेक्सिकन कामगार स्वस्त नव्हता. याबरोबरच असेही आढळून आले आहे की पश्चिम युरोप व अमेरिकेतील कंपन्या एकाच वेळी उत्पादन केंद्रे अनुक्रमे पूर्व युरोप आणि चीन किंवा मेक्सिको आणि चीन येथे हलवतात. कारण विक्री जर जवळच्या प्रदेशातच प्रामुख्याने होणार असेल, तर वाहतुकीचा खर्च आणि बाजाराची भौगोलिक निकटता महत्त्वाचे घटक ठरतात. शिवाय वेतन हा एकमेव निर्णायक

घटक नसतो. कामगाराचे कौशल्य, सामाजिक सुरक्षा व चीनच्या संदर्भात उल्लेख केलेले मालमत्तेवरचा हक्क, कायदे या सगळ्याचाच विचार केला जातो.

विषमता, भ्रष्टाचार आणि वर्तमान

कळीचा प्रश्न अर्थातच भांडवलशाही साम्राज्यवादाने सामाजिक विषमतेत भर पडते का हा आहे. त्याचे उत्तर सद्यस्थितीत 'हो' असे दिसते.

अँगस मॅडिसन नावाच्या ज्येष्ठ अर्थतज्ज्ञाने इसवीसन एकपासून २००३ पर्यंत जागतिक आर्थिक विषमतेचा आढावा घेतला. त्याचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

दरडोई उत्पन्नाचे आकडे (१८९० च्या डॉलर्समध्ये)

इ.स.	पश्चिम	उर्वरित जग	संपूर्ण जग	पश्चिम भागिले उर्वरित जग
१	५६९	४५३	४६७	१.३:१
१०००	४२६	४५१	४५०	०.९:१
१५००	७५३	५३८	५६७	१.४:१
१८७०	२०५०	६०९	८७३	३.३:१
१९१३	३९८८	८८०	१५२६	४.५:१
१९५०	६२९७	११२६	२११३	५.६:१
१९७३	१३३७९	२३७९	४०९१	५.६:१
२००३	२३७१०	४२१७	६५१६	५.७:१

वरील तक्त्यावरून लक्षात येईल की विसाव्या शतकापासून आतापर्यंत पश्चिम आणि उर्वरित जगातील दरी एकदम वाढली. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार जगातले ४४ टक्के लोक दारिद्र्यरेषेच्या (दर दिवसा दोन डॉलर्स) आसपास किंवा खाली असतात. वर्तमान भांडवलशाही संपूर्ण समाजाचा विकास करत नाही. त्यामुळे आर्थिक दारिद्र्य आणि विषमता अल्प प्रमाणात कमी जास्त होईल, पण नष्ट होत नाही. अमेरिकेत १९१७ ते १९४० पर्यंत वरच्या एक टक्का लोकांची मिळकत राष्ट्रीय मिळकतीच्या १७ टक्के होती. १९७३ ला तेलाचे भाव कडाडले आणि ही मिळकत ८.४ टक्केवर आली. १९७० च्या दशकाच्या मध्य ते २००१ या उदारीकरणाच्या दशकांनंतर मिळकत १८.६ टक्केवर पोचली. या दरम्यान खालच्या ९० टक्के लोकांची मिळकत १२ टक्केने कमी झाली. चीनच्या स्वत:च्या अधिकृत आकडेवारीनुसार वरच्या १० टक्के शहरवासियांकडे शहराची ४५ टक्के मालमत्ता असते तर खालच्या १० टक्केंकडे फक्त १.४ टक्का. दुसऱ्या एका अंदाजानुसार २०% शहरवासियांची मिळकत शहराच्या मिळकतीच्या तीन टक्के असते. ही जर या देशांची अंतर्गत परिस्थिती, तर त्याला साम्राज्यवादाची जोड मिळाल्यावर देशाबाहेरचे चित्र अधिक विषमतेचे होणार हे नक्की. कारण साम्राज्यवाद व्याख्येनुसारच विषमता निर्माण करतो.

अगदी उदारीकरणाच्या काळातही विकसित जगात उत्पादन वाढले तरी नफा त्या प्रमाणात वाढत नाही असे दिसून आले आहे. त्यामुळे जेथे नफा वाढायची शक्यता असते, किंवा जेथे नफा वाढवण्यासारखी सामाजिक-राजकीय परिस्थिती निर्माण करता येऊ शकते, तेथे आर्थिक, औद्योगिक आणि व्यापारी भांडवल शिरकाव करते. मग गरीब-श्रीमंत यातील वाढती किंवा फारतर कायम राहणारी तफावत आणि नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी वाढती आंतरराष्ट्रीय स्पर्धा यामुळे हा शिरकाव सामाजिक अशांततेत भर घालताना दिसतो. एस्ईझेड हे आपल्याकडचे उदाहरण आहे.

देशांतर्गत विषमतेचे दोन गणक पाहू. हे दोन्ही संयुक्त राष्ट्रसंघ वापरतो. देशातील वरच्या १० टक्के वर्गाची सरासरी मिळकत भागिले तळातल्या १० टक्के वर्गाची मिळकत हा एक निर्देशांक आहे. या दोन वर्गातली दरी जितकी जास्त, तितका हा निर्देशांक जास्त. जगात सगळ्यात जास्त तफावत दक्षिण अमेरिकेतील बोलिव्हिया या देशात आहे. (निर्देशांक १६८.१). सगळ्यात कमी तफावत जपानमध्ये आहे. (४.१). चीनचा निर्देशांक २१.६, अमेरिकेचा १५.९, भारताचा ८.६ आणि युरोपियन युनियनचा ८ च्या आसपास आहे.

ट्रान्स्परन्सी इंटरनॅशनल ही संस्था भ्रष्टाचाराच्या लोकांच्या समजुतीनुसार देशांची यादी बनवते. ज्या देशाचा क्रमांक जास्त, त्या देशात भ्रष्टाचार जास्त. डेन्मार्क हा युरोपियन देश सगळ्यात कमी भ्रष्टाचार असल्याने क्रमांक एकवर आहे. युरोपातील भांडवलशाही लोकशाही असणारे देश १ ते ३२ या क्रमांकांवर आहेत. अमेरिका २३ वर आहे. चीन ७८ वर तर भारत ८७ वर आहे.

वरील आकडेवारीवरून हे लक्षात यावे की अमेरिका किंवा चीन आदर्श (मॉडेल) म्हणून अयोग्य आहेत. त्यामानाने कल्याणकारी राज्ये काही प्रमाणात तरी टिकवून धरणारा युरोप अधिक न्याय्य व्यवस्था देतो.

भांडवलशाही साम्राज्यवादाच्या विरोधात जगभर अनेक चळवळी उभ्या राहिलेल्या आहेत व रहातही आहेत. विकीलिक्ससारखी इंटरनेटवर संपूर्ण आधारित नवी 'संघटना' सगळ्याच सरकारांना हलवू शकते. पण या संक्रमणाच्या काळात उजव्या शक्ती जशा आपल्या ध्येयाबाबत स्पष्ट विचार करून कार्यक्रम आखतात, तसा वैचारिक नि:संदिग्ध दृष्टिकोन डाव्या किंवा अ-उजव्या चळवळीत दिसत नाही. उजव्यांना संपत्ती असणारा वर्ग आणि सत्ता कायम राखायची असते. अशांततेच्या व सध्याच्या अनिश्चिततेच्या आधीचे स्थैर्य त्यांना परत आणायचे असेत. अमेरिकेतील टी-पार्टी ही चळवळ अशा कार्यक्रमाचे

उदाहरण आहे. पण प्रागतिक विचारसरणीच्या चळवळीत वैचारिक गोंधळ असतो कारण ही परिस्थिती का उद्‌भवली याचे प्रत्येक प्रागतिक चळवळ वेगळे उत्तर देते. त्यात वावगे काही नाही पण त्यामुळे अशा चळवळींचे किमान कार्यक्रमावर एकत्र येणे अवघड होते आणि भांडवलशाही या चळवळींना एकमेकांत झुंजत ठेवण्यात यशस्वी होते.

जगातील एक तृतीयांश देश अजूनही या ना त्या रूपाच्या हुकूमशाहीखाली आहेत. मग ती अमेरिकन साम्राज्यवादाने टिकवून धरलेली सौदी अरेबियाची घराणेशाही असो किंवा चिनी भांडवलशाहीने टिकवलेली उत्तर कोरियाची 'साम्यवादी' घराणेशाही असो. त्यामानाने भारतात विरोधाची तरी मोकळिक आहे. डेव्हिड हेल्ड व डॅनियन बेल या विचारवंतांच्या मते राष्ट्र-राज्य एका चिमट्यात सापडले आहे. एकीकडे जागतिकीकरणाचा सामना करायला ते थिटे पडत आहे तर दुसरीकडे तळागाळातल्या स्वत:च्या जनतेचे प्रश्न सोडवायला ते फार मोठे झाले आहे. त्यामुळे राष्ट्र-राज्याच्या वरच्या स्तरावर आणि अगदी स्थानिक पातळीवर पर्यायी संरचना आवश्यक आहेत. वरच्या स्तरावरच्या संरचना म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ किंवा आंतरराष्ट्रीय कोर्ट अधिक लोकाभिमुख होणे किंवा लोकांना उत्तरदायी होणे.

भारतीय संदर्भात हे तळागाळातले प्रश्न सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर अशा संरचना गेली अनेक वर्षे झटत आहेत. त्या National Centre for Advocacy Studies किंवा SEARCH सारख्या असतील. या संघटना व्यवस्थेशी प्रत्यक्ष संघर्ष न करताही पर्यायी संरचना उभी करताना दिसतात. दुसऱ्या प्रकारच्या संघटना बेगुमान खाणी, एसईझेड यांच्या विरोधात राष्ट्र-राज्याशी प्रत्यक्ष संघर्ष करताना दिसतात. त्या माओवाद्यांसारख्या हिंसक असतील किंवा अहिंसक असतील पण दोन्ही जनजागृती करतात व प्रसंगी सरकारी धोरण बदलण्यात यशस्वी होतात.

तुलना म्हणून अत्यंत असंगत संदर्भातील एक उदाहरण पाहू. इराणमध्ये कडवी धर्ममार्तंड पुरुषप्रधान राजवट आहे. त्यांच्या इस्लामच्या समजुतीनुसार विवाह ही आमरण संस्था आहे. लग्न झाल्यावर, ते फसले आहे हे लक्षात आल्यावर स्त्रीला आजवर त्यातून सुटका नसे. पण अशा विवाहातून स्वत:च्या पुढाकाराने घटस्फोट घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अगदी अलिकडे प्रचंड वेगाने वाढत आहे. शरियातील तरतुदींचा नवा अर्थ लावून या गांजलेल्या, हिंसाचाराचे बळी असलेल्या स्त्रियांनी ही वाट शोधली आहे. तात्पर्य, अगदी वैयक्तिक पातळीवर अत्यंत प्रतिकूल समाजव्यवस्थेतही मानवी प्रयत्न स्वातंत्र्याकडे नेऊ शकतो. लेखाच्या अगदी सुरूवातीला भांडवलशाहीच्या लवचिकपणाचा आणि धूर्तपणाचा उल्लेख केला होता. वास्तव निर्माण करण्याच्या अमेरिकन भांडवलशाही साम्राज्यवादाच्या दंभाचाही मध्यंतरी उल्लेख केला आहे. या स्त्रियांचा लवचिकपणा आणि चाणाक्षपणा भांडवलशाहीच्या लवचिकपणावर व धूर्तपणावर मात करण्यासाठी अनुकरणीय वाटतो.

राष्ट्र-राज्य 'फार मोठे' झाल्याचा फायदा म्हणजे व्यवस्थेतील फटीही मोठ्या होत जातात. त्या अवकाशात स्थानिक संस्थांचा विस्तार व खोली वाढवणे आजमितीला शक्य आहे आणि पुरेसेही आहे.

संदर्भ –

Bacon, D., 2008 : *Illegal People: How Globalization Creates Migration and criminalsies Immigrants.* Boston: Beacon

Baylis S., Smith S. and Owens P. [eds.] 2003 : *The Globalization of World Politics.* New York : Oxford university Press

Callinicos, A., 2009 : *Imperialism and Global Political Economy.* Cambridge : Polity

Chomsky, N., 1996 : *Powers and Prospects.* London : Pluto

Cohan, W.D., 2009 : *House of Cards : How Wall Street's Gamblers broke Capitalism* London :Allen Lane

Giddens, A., 2009 : *The Politics of Climate Change.* Cambridge : Polity

Hutton , W. & Giddens, A. , 2000 : *On the Edge.* London :Jonathan Cape

Pestieau, P., 2006 : *The welfare State in the European Union : Economic and Social Perspective* New York : Oxford University Press

Schmidt-Bleek, F., 2009 : *The Earth Natural Resources and Human Intervention.* London : Haus

Various issues of the following magazines, newspapers - The Economist, International Herald Tribune, The Guardian

Web-sites of - UNO, UNDP, OECD, zmag, etc.

चंद्रशेखर पुरंदरे

सामाजिक मुद्यांवर भाष्य करणारे चित्रकार, आंतरराष्ट्रीय राजकीय-आर्थिक-सामाजिक विषयांवर चिंतन व लेखन

E-mail - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com